# मेट्रो-३ लागणार मार्गी

म. टा. प्रतिनिधी, मुंबई

मुंबईच्या वाहतुकीचा कायापालट करण्यासाठी मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने बुधवारी कुलाबा-वांद्रे-सीप्झ या मेट्रो ३ या संपूर्ण भुयारी मार्गाच्या टप्प्यासाठी चार कंपन्यांसोबत प्रकल्प बांधकामाच्या करारावर स्वाक्षऱ्या केल्या. सुमारे १८ हजार ११४ कोटी रुपये खर्चाच्या या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाच्या प्रत्यक्ष कामाला ऑक्टोबरपासून सुरुवात होणार आहे. सध्या प्रकल्पाचे सर्वेक्षण, चाचण्या आदी प्राथमिक कामे सुरू आहेत.

या मार्गासाठी एमएमआरसीने पाच कंपन्यांना सात पॅकेजच्या बांधकामाचे कंत्राट दिले आहे. बुधवारच्या बैठकीत सहा पॅकेजचे काम मिळालेल्या चार कंपन्यांशी करार झाला, तर पाचव्या कंपनीच्या करारावर लवकरच स्वाक्षऱ्या होणार असल्याची माहिती एमएमआरसीच्या व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे यांनी दिली.